आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष १० वे ● अंक २३८ वा ● बुधवार १० जून २०२६ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक

लातूर, दि. ९ : अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या, परंतु समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविली जात असून, या शैक्षणिक वर्षापासून योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असून, शालेय अभ्यासक्रमासाठी ३० जूनपर्यंत, तर अकरावी, बारावी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलैपर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत.

गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही, अशाच विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी पात्र ठरविले जाईल; मात्र जे विद्यार्थी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणार नाहीत, त्यांना वसतिगृह किंवा स्वाधार या दोन्हीपैकी कोणतीही योजना मिळणार नाही. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत, तेथे हा नियम शिथिल असला तरी, भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करून ठेवावेत, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## खरीप हंगाम २०२६ : कापूस व कडधान्य पीक प्रात्यक्षिकांसाठी महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. ९ : लातूर विभागातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' आणि 'केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता अभियान' अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी क्षेत्रातील सहकारी संस्थांनी 'महाडीबीटी' प्रणालीवर त्वरित ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन लातूर विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी केले आहे.

सुधारित वाणांचे दर्जेदार बियाणे, जैविक खते, कीटकनाशके आणि बीजप्रक्रिया औषधी इत्यादी निविष्ठांचा पुरवठा करून १० हेक्टर (२५ एकर) क्षेत्रावर आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी हे अभियान राबविले जात आहे. सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' असल्याने, निवड होणाऱ्या एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के महिला शेतकरी असणे बंधनकारक आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत नोंदणीकृत असलेले शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि कृषी सहकारी संस्था अर्ज करण्यास पात्र आहेत. ज्यांनी मागील दोन वर्षांत या योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांना यावर्षी लाभ मिळणार नाही. तसेच, शेतकरी गट किंवा कंपनीमधील केवळ 'फार्मर आयडी' असलेले सदस्यच पात्र असतील.

इच्छुक संस्थांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करावा. अर्जासाठी जवळचे सेतू केंद्र, सीएससी केंद्र किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधता येईल. अर्जांची निवड 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार असल्याने, पात्र संस्थांनी लवकरात लवकर अर्ज सादर करावेत. लातूर विभागातील लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील पात्र शेतकरी गटांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

## वाहतूक नियंत्रण शाखेतील अंमलदार याच्याविरुद्ध निलंबनाची कार्यवाही

लातूर : दिनांक ०७/०६/२०२६ रोजी मिनी मार्केट येथे वाहतूक नियंत्रण शाखेतील अंमलदार पोकॉ/८२० शरद कांदे हे वाहतूक नियमानासाठी थांबले असता त्या ठिकाणी एका मोटरसायकल स्वारास चुकीच्या पद्धतीने थांबवण्याचा प्रयत्न केला असता तो पडल्याचे क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली होती.

त्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री.अमोल तांबे, पोलीस अधीक्षक लातूर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. समीरसिंह साळवे यांना यांची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. साळवे यांनी चौकशी अहवाल सादर केला असून त्यामध्ये पोलीस अंमलदार शरद कांदे यांनी कसुरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना तात्काळ निलंबन करून विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

# लातूर एमआयटीत बालरोग विभागाची प्रगत व मुलभूत जीवनरक्षण प्रणाली प्रशिक्षण कार्यशाळा




लातूर दि.९ :- लातूर येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाच्या बालरोगशास्त्र विभागातर्फे भारतीय बालरोग संघटना (इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स) अंतर्गत तीन दिवसीय प्रगत जीवनरक्षण प्रणाली (ॲड्व्हान्स लाईफ सपोर्ट) आणि मुलभूत जीवनरक्षण प्रणाली (बेसिक लाईफ सपोर्ट) प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वीरित्या पार पडली.

एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाविद्यालय परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या सहकार्य व प्रोत्साहनातून वैद्यकीय महाविद्यालयातील सुसज्ज कौशल्य प्रयोगशाळा (स्किल लॅब) येथे आयोजन करण्यात आले होते.

प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा आणि शैक्षणिक प्रकल्प संचालिका डॉ. सरिता मंत्री यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. सुरेश भट्टड, लातूर आयएपीचे सचिव डॉ. किरण होळीकर व कोषाध्यक्ष डॉ. मंगेश डाके यांच्यासह बालरोग विभागातील विभाग प्रमुख, संबंधित सर्व डॉक्टर्स यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यशाळेत डॉ. भावेश शहा मिरज यांच्या नेतृत्वाखाली डॉ. दीपिका माशळकर लातूर, डॉ. उदय राजपूत सातारा, डॉ. अमोल गिरवलकर कोल्हापूर, डॉ. नरेश सोनकावडे ठाणे, डॉ. राहुल डावरे पुणे, डॉ. विनोद इंगळे छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. संगीता चिवळे पुणे या राज्यभरातील तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.

लातूर एमआयटीच्या बालरोगशास्त्र विभाग प्रमुख तथा लातूर आयएपीच्या अध्यक्षा डॉ. विद्यादेवी कांदे यांच्या पुढाकारातून आणि डॉ. दीपिका माशळकर यांच्या संकल्पनेतून व समन्वयातून कार्यशाळेचा उपक्रम राबविण्यात आला. तर डॉ. शीतल भट्टड आणि डॉ. विशाखा पडिले यांनी स्थानिक पातळीवरील नियोजनात मोलाची मदत केली.

या तीन दिवसीय कार्यशाळेत आजारी बालकांमधील गंभीर लक्षणे ओळखणे, आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करणे तसेच तातडीच्या उपचारांची प्रात्यक्षिकांसह (हँड्स-ऑन) सखोल प्रशिक्षण देण्यात आले. मर्यादित जागा असलेल्या या कार्यशाळेत राज्यभरातून आलेल्या ३८ डॉक्टरांनी सहभाग घेतला होता.

बालरोग क्षेत्रातील आपत्कालीन वैद्यकीय उपचारांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि डॉक्टरांचे कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे संस्थेच्या व्यवस्थापनाचे, प्रशासनाचे आणि सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान असून, आयोजक समितीने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातून आणि आयएपी सदस्यांकडून आयोजक समितीचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# रस्ते अपघातातील मृत्यू रोखण्यासाठी जनजागृतीवर भर द्यावा - जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड




लातूर, दि. ९ : जिल्ह्यात रस्ते अपघातामध्ये होणारे मृत्यू रोखण्यासाठी वाहतूक नियमांविषयी जनजागृतीवर भर देण्याची आवश्यक आहे. चारचाकी चालविताना शीट बेल्टचा वापर आणि दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर केल्यास अपघाती मृत्यूंची संख्या कमी होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड म्हणाले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता अलका डाके, एनआयसीचे पुरुषोत्तम रुक्मे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

अपघातांविषयी माहिती संकलनासाठी आणि त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाने आयआरएडी पोर्टल कार्यान्वित केले आहे. जिल्ह्यातील सर्व अपघातांची माहिती संबंधित यंत्रणांनी विहित कालावधीत या पोर्टलवर अपलोड करावी. यामध्ये विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे नागरिकांनी वाहन चालविताना वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

अपघाती मृत्यूमधील जवळपास ७० टक्के मृत्यू हे दुचाकी अपघातातील आहेत. दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर केल्यास हे मृत्यू रोखणे शक्य आहे. त्यामुळे दुचाकी चालविताना सर्वांनी हेल्मेटचा वापर करावा, असे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे म्हणाले. तसेच महामार्गांना जोडणाऱ्या रस्त्यांवर गतिरोधक बसविल्यास महामार्गावरील अपघात कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

# कोल्हापूर आणि पुण्यात २४.८१ लाख रुपयांचा औषधसाठा जप्त; एफडीएची कारवाई



मुंबई, दि. ९ जून : अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कोल्हापूर आणि पुणे जिल्ह्यात ८ जून २०२६ रोजी दोन कारवाया करत एकूण २४ लाख ८१ हजार रुपये किमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आला असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.

कोल्हापूरमध्ये औषधसाठा जप्त

कोल्हापूर येथील रविवार पेठ परिसरातील मे. मेडटॅब्स फार्मा प्रा. लि. येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने छापा टाकला. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथिक औषधे, विशेषतः प्रतिजैविक (ॲंटिबायोटिक) इंजेक्शन्सचा साठा आढळून आला. सदर औषधांच्या खरेदी-विक्रीसाठी आवश्यक परवाने व वैध कागदपत्रे नसल्याने औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० मधील तरतुदींचे उल्लंघन प्रकरणी औषधांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून उर्वरित २९ प्रकारच्या औषधांचा १३.६२ लाख किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

पुण्यात औषध कंपनीच्या गोदामावर कारवाई

दुसऱ्या कारवाईत पुणे जिल्ह्यातील वडकी येथे असलेल्या मे. सिप्ला फार्मा अँड लाइफ सायन्सेस लिमिटेड यांच्या गोदामाची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान 'रेक्टीन प्लस टॅब्लेट' या शेड्यूल एच अंतर्गत येणाऱ्या प्रिस्क्रिप्शन औषधाच्या पॅकेजिंगवर औषधाच्या वापराबाबत जाहिरात करण्यात आल्याचे आढळून आले. अशा प्रकारची जाहिरात औषधे व सौंदर्यप्रसाधने नियम, १९४५ मधील तरतुदींशी विसंगत असल्याने संबंधित औषधाचा सुमारे ११.१९ लाख किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. औषध उत्पादक व विक्रेत्यांनी सर्व कायदे व नियमांचे काटेकोर पालन करावे. राज्यात औषध उत्पादन, साठवण, वितरण आणि विक्री क्षेत्रातील कोणतीही बेकायदेशीर काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा कंपन्यांविरुद्ध कठोर व सातत्यपूर्ण कायदेशीर कारवाई पुढेही सुरू राहील, असा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

औषधे केवळ अधिकृत व परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावीत. संशयास्पद औषध विक्री, बेकायदेशीर साठा किंवा अनियमिततेची माहिती प्रशासनाला तात्काळ द्यावी असे आवाहन केले आहे.

## सिस्टमला झटका देणारा अधिकारी, जर सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मी तुकाराम मुंढे ही मोहीम सुरु केली तर......

तुकाराम मुंढे हे नाव आज त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांच्या कार्य



पद्धतीमुळे राज्यातील प्रत्येक घराघरात पोहोचले आहे. मुंढेंची ओळख आहे फाईल्स टेबलावर ठेवण्याऐवजी फील्डवर जाणं, नियमांची पायमल्ली न करणं आणि सर्वात महत्त्वाचं राजकीय दबावाला न झुकणं. मात्र हे शिवधनुष्य एकट्यानेच का उचलावे हा प्रश्न आजघडीला तरी अनुत्तरित आहे.

जी कामे एक अधिकारी करू शकतो तीच कामे इतर अधिकाऱ्यांना का वर्ज्य असतील. राज्यातील प्रत्येक अधिकाऱ्याने ठरवले तर फाईल्स वर्षानुवर्षे पडून राहणार नाहीत, ठेकेदारीतलं कमिशन सिस्टिम मोडेल, ग्राऊंड लेव्हलवर अधिकारी दिसायला लागतील. मुंढे नेहमीच राजकीय हस्तक्षेपाला उघड विरोध करतात. त्यामुळे सगळ्यांनी त्यांची भूमिका घेतली तर सुरुवातीला प्रचंड घर्षण होईल संघर्ष होईल, बदल्यांचे सुळसुळाट होतील पण १-२ वर्षांत राजकारणींना कळेल की हा अधिकारी विकला/वाकला जाणार नाही. मग काम करणाऱ्या अधिकाऱ्याला राजकीय संरक्षण मिळायला लागेल. सध्या सगळे सारखेच ही धारणा आहे. जर १०० पैकी ८० अधिकारी प्रामाणिकपणे काम करू लागले तर तक्रार निवारणाचा वेग वाढेल, भ्रष्टाचाराचा धोका कमी होईल, लोकांचा सिस्टमवरचा विश्र्वास परत येईल.

पण हे आपण समजतो किंवा अपेक्षा करतो तेवढं सोपं नाही. सगळ्यांची तशी मानसिक तयारी नसते. घर, कुटुंब, बदल्यांची भीती असते. काही अधिकारी खरंच नियमात काम करायचं सोडून फक्त प्रसिद्धी साठी करतील. सिस्टीम इतकी लवकर बदलत नाही. एकटा मुंढे झेलता येईल पण १०० मुंढे झेलणं सिस्टीमसाठी कठीण होईल.

मी तुकाराम मुंढे ही मोहीम जर खऱ्या अर्थाने झाली तर महाराष्ट्राच्या प्रशासनात ५ वर्षात दिसणारा बदल होईल. पण त्यासाठी फक्त नारा पुरेसा नाही त्या नावामागची किंमत मोजायची तयारी लागते हे ही तितकेच खरे. मात्र एक सुजान नागरिक म्हणून आपण एवढं स्वप्न तर पाहू शकतो. सध्याच्या तरुण आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये ही रिस्क घ्यायची हिंमत नक्कीच आहे.

जय हिंद

**सतीश तांदळे**
**माझं लातूर परिवार**

## खरीप हंगाम २०२६: तूर, मूग, उडीद व ज्वारीच्या प्रमाणित बियाण्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन



लातूर, दि. ९: खरीप हंगाम २०२६ साठी विविध शासकीय योजनांतर्गत प्रमाणित बियाणे वितरणाची प्रक्रिया सुरू झाली असून, लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी शेतकऱ्यांना 'महाडीबीटी' प्रणालीद्वारे त्वरित अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियाना'अंतर्गत तूर, मूग आणि उडीद या पिकांसाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेतील तरतुदींनुसार पाच वर्षांच्या आतील वाणासाठी ६ हजार रुपये प्रति क्विंटल अनुदान, पाच ते दहा वर्षांच्या आतील वाणासाठी ३ रुपये प्रति क्विंटल अनुदान दिले जाईल. सन २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे केले जात आहे. याची दखल घेत, या योजनेतील एकूण लाभार्थ्यांपैकी किमान ३० टक्के निवड महिला शेतकऱ्यांची केली जाणार आहे.

या योजनेसाठी शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी'चा वापर करून महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा. लाभार्थी निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच, आपल्या परिसरातील मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी किंवा उपकृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. अर्जदार शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार असलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# मराठवाड्यातील शेतकऱ्याची पावसाची अपेक्षा!

## खरीप हंगामात तूर, मूग, उडीद बियाणे संच वाटपासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

लातूर, दि. ९ : खरीप हंगाम २०२६ अंतर्गत शासनाच्या विविध योजनांतर्गत शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर बियाणे संच (सीड किट) उपलब्ध करून देण्यात येणार असून, यासाठी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान' अंतर्गत तूर, मूग आणि उडीद या पिकांचे ४ किलो वजनाचे बियाणे आणि जैविक खताची पाकिटे पाच वर्षांच्या आतील वाणांसाठी वितरीत केली जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी'चा वापर करून महाडीबीटी पोर्टलच्या (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/-griLogin) अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करणे आवश्यक आहे.

या प्रक्रियेत 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड केली जाणार असून, सन २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष असल्याने एकूण लाभार्थी निवडीमध्ये किमान ३० टक्के महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या योजनेबाबत अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा आपल्या क्षेत्रातील सहाय्यक, मंडळ किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक महेशकुमार तिर्थकर यांनी केले आहे. अर्जदार शेतकऱ्यांना योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

## संजय राऊतांनी औरंगजेबाच्या कबरीवर जाऊन आत्मचिंतन करावे, भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांचा घणाघात

मुंबई : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यापेक्षा अधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी केला आहे. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात अतिशय उत्तम कामगिरी केली आहे. संजय राऊत सल्ला देत आहेत की पंतप्रधान मोदीजींनी केदारनाथला जाऊन आत्मचिंतन करावे. पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी केदारनाथचा आदर करत असल्याने तिथे जाऊन ते आत्मचिंतनही करतात. मात्र संजय राऊत आणि इंडिया आघाडीच्या लोकांनी केदारनाथऐवजी औरंगजेबाच्या कबरीवर जाऊन आत्मचिंतन करावे. कारण त्यांना औरंगजेबाचा उदोउदो करणे एवढेच जमते, अशी घणाघाती टीका भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी केली. मुंबई प्रदेश कार्यालयातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पत्रकार परिषद घेतली नाही म्हणून संजय राऊत आक्षेप घेत आहेत. पाच वर्षांपासून रोज सकाळी उठून पत्रकार परिषद घेणाऱ्या संजय राऊतांनी नेमके काय दिवे लावलेत, हे एकदा महाराष्ट्राला सांगावे असे सुनावत श्री. बन म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे नेतृत्व देशातील १४० कोटी जनतेने मान्य केले आहे. सातत्याने जनतेशी संपर्क, जनतेची सेवा करणे हे आपले कर्तव्य समजत असल्यानेच ३७० कलम हटवण्याची हिंमत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात झाली. तिहेरी तलाक रद्द करण्याची हिंमत झाली. हजार वर्षांपासून प्रत्येक भारतीय हिंदू नागरिक पाहत होता, ते राम मंदिराचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम त्यांनी केले.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आपली संपत्ती देशासाठी दान केली, तर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी एक रुपयाही आपल्या कुटुंबासाठी कमावला नाही. गेल्या २५ वर्षांपासून २४ तास देशसेवेसाठी देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. मोदीजींनी मेवा खाल्ला नाही तर जनतेची सेवा केली आहे. संपत्ती कमवून त्यांनी आपली घरे भरली नाहीत की मातोश्री टू बांधला नाही. सरकार आल्यानंतर कोणी मातोश्री टू बांधला होता, याचे उत्तर एकदा संजय राऊतांनी द्यावे, अशा शब्दात श्री. बन यांनी फटकारले.

राहिला प्रश्न पक्ष फोडण्याचा, तर पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी कुठलाही पक्ष फोडला नाही. उद्धव ठाकरे, संजय राऊत यांना आपला पक्ष टिकवता आला नाही, हिंदुत्व टिकवता आले नाही. तुम्ही आपला पक्ष काँग्रेसच्या दावणीला नेऊन बांधला म्हणून एकनाथजी शिंदे यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार जिवंत ठेवण्याचे काम केले. उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्ववाद सोडल्याने तुमचे पक्ष फुटले आहेत. तुमचे अस्तित्व संपवण्याचे काम तुमच्या पक्षातूनही झाले आहे आणि या देशातल्या जनतेनेही केले असल्याचे श्री. बन यांनी नमूद केले.

कुठलाही प्रश्न आला की ते किरीट सोमय्या यांनी केले पाहिजे, भाजपाने केले पाहिजे, पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी, देवाभाऊंनी केले पाहिजे. मग हे कथित घोटाळे झाले वाटत असेल तर अंडी उबवण्यापेक्षा तुम्ही आंदोलन करा, घराबाहेर पडा. हवे तर उद्धवजी ठाकरेंना सोबत घ्या. जनतेच्या हितासाठी उद्धव ठाकरे यांनी एखादे आंदोलन करावे तर त्यांना आमच्या मनापासून शुभेच्छा, अशा शब्दात श्री. बन यांनी खरडपट्टी काढली.

## संपादकीय...

मराठवाडा हा महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त आणि पावसाच्या अनिश्चिततेशी झुंजणारा प्रदेश म्हणून ओळखला जातो. येथील शेतकऱ्यांचे जीवन, अर्थकारण आणि भविष्य मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून असते. दरवर्षी जून महिना सुरू होताच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागतात. काळे ढग दिसले की आशेची पालवी फुटते. पहिल्या पावसाच्या सरींनी कोरड्या जमिनीला जीवदान मिळते. मात्र पावसाचा लहरी स्वभाव शेतकऱ्यांची चिंता वाढवत असतो.

मराठवाड्यातील बहुतांश शेती ही कोरडवाहू स्वरूपाची आहे. येथे सिंचनाची साधने मर्यादित आहेत. त्यामुळे खरीप हंगामाचे यश पूर्णतः मान्सूनवर अवलंबून असते. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांसारखी पिके पावसाच्या वेळेवर आणि प्रमाणावर अवलंबून असतात. पाऊस वेळेवर पडला तर शेतकरी आनंदित होतो. उशिरा पडला तर पेरणी लांबते. मधेच खंड पडला तर उगवलेली पिके धोक्यात येतात. अतिवृष्टी झाली तरी नुकसान आणि अवर्षण झाले तरी नुकसान अशी परिस्थिती निर्माण होते.

गेल्या काही वर्षांत हवामान बदलाचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित झाले आहे. कधी अतिवृष्टी तर कधी दीर्घकाळ कोरडे वातावरण असे चित्र दिसते. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे विस्कळीत होते. अनेक वेळा दुबार पेरणी करण्याची वेळ येते. त्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. बियाणे, खते आणि औषधांच्या वाढत्या किमतींमुळे अडचणी आणखी वाढतात.

यंदाही मराठवाड्यातील शेतकरी समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. काही भागांत पाऊस झाला असला तरी सर्वत्र समान प्रमाणात झाला नाही. अनेक ठिकाणी पेरण्या रखडल्या आहेत. तर काही शेतकऱ्यांनी धोका पत्करून पेरणी केली आहे. पावसाने पाठ फिरवली तर त्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. म्हणूनच प्रत्येक शेतकरी आभाळाकडे आशेने पाहत आहे.मराठवाड्याची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात शेतीवर आधारित आहे.शेतकऱ्याच्या हातात पैसा आला तर बाजारपेठा गजबजतात.व्यापार, उद्योग आणि सेवा क्षेत्रालाही चालना मिळते. पण दुष्काळ पडला की संपूर्ण ग्रामीण अर्थचक्र मंदावते.रोजगाराच्या संधी कमी होतात.शेतमजुरांनाही काम मिळत नाही.ग्रामीण भागात आर्थिक संकट निर्माण होते.

शेतकऱ्यांची पावसाकडून अपेक्षा ही केवळ शेतीपुरती मर्यादित नसते.त्यांच्या घरातील मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि कर्जफेड यांचा संबंधही पावसाशी जोडलेला असतो.चांगले उत्पादन मिळाले तर कर्ज फेडण्याचा मार्ग मोकळा होतो.अन्यथा कर्जाचा डोंगर वाढत जातो.ही परिस्थिती अनेकदा मानसिक तणाव निर्माण करते.सरकारने जलसंधारण आणि सिंचन प्रकल्पांवर अधिक भर देणे आवश्यक आहे.शेततळी, बंधारे आणि पाणी साठवण प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे.

सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाचा वापर वाढवला पाहिजे.कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे.हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर शेतीचे नियोजन नव्याने करणे काळाची गरज आहे. हवामान खात्याच्या अचूक अंदाजांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचली पाहिजे.यामुळे पेरणी आणि पीक व्यवस्थापनाचे निर्णय योग्य वेळी घेता येतील.तसेच पीकविमा योजना अधिक प्रभावी आणि पारदर्शक असणे आवश्यक आहे.नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना तत्काळ मदत मिळाली पाहिजे.आज मराठवाड्यातील शेतकरी फक्त पावसाची वाट पाहत नाही.तो आपल्या कष्टांचे फळ मिळण्याची वाट पाहत आहे.त्याच्या डोळ्यांत चांगल्या उत्पादनाची स्वप्ने आहेत.त्याच्या मनात कर्जमुक्तीची आशा आहे.त्याच्या कुटुंबाच्या उज्वल भविष्यासाठी तो आकाशाकडे पाहत आहे.

पाऊस हा मराठवाड्यातील शेतकऱ्यासाठी केवळ नैसर्गिक घटना नाही.तो जीवनाचा आधार आहे.तो आशेचा किरण आहे. तो समृद्धीचा मार्ग आहे.आणि म्हणूनच प्रत्येक वर्षी पहिल्या पावसाच्या सरींसोबत मराठवाड्यातील शेतकरी नव्या आशा, नव्या स्वप्नांसह नव्या हंगामाचे स्वागत करत असतो.त्याची ही अपेक्षा पूर्ण व्हावी, हीच समाजाची आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी. सोलार पॅनल व कॉपर वायर चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश; १३ गुन्ह्यांची उकल, १६.५९ लाखांचा मुद्देमाल जप्त

लातूर : लातूर जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून ग्रामीण भागातील सोलार प्रकल्प, शेतकऱ्यांच्या शेतातील सौरऊर्जा यंत्रणा, विद्युत केबल्स, कॉपर वायर तसेच औद्योगिक भागातील मौल्यवान विद्युत साहित्य चोरीच्या घटना घडल्या होत्या त्या पार्श्र्वभूमीवर लातूर पोलीस दलाने मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या टोळ्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली होती. या मोहिमेला मोठे यश मिळवत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी एका सराईत आंतरजिल्हा चोरट्या टोळीचा पर्दाफाश केला असून तब्बल १३ गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळविले आहे.

पोलीस अधीक्षक लातूर श्री अमोल तांबे यांच्या सूचना व निर्देशान्वे, अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांच्या नेतृत्वाखाली मालमत्तेविरुद्ध गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध सुरू असताना दिनांक ९ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी पाच नंबर चौकात तात्काळ सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची ओळख

१) बालाजी अरुण काळे (रा. सरमकुंडी फाटा, ता. वाशी, जि. धाराशिव)

२)आकाश उर्फ भैया नवनाथ पवार (रा. सुर्डी, ता. केज, जि. बीड, सध्या रा. शिराढोण पारधी पिढी, जि. धाराशिव)




अशी पटली. आरोपींच्या ताब्यातील टाटा व्हिस्टा कारची झडती घेतली असता वाहनातील पिशवीमध्ये तब्बल ११ लाख ९ हजार रुपयांची रोख रक्कम आढळून आली. एवढी मोठी रक्कम पाहून पोलिसांना संशय आल्याने आरोपींकडे सखोल चौकशी करण्यात आली.

पोलीसी खाक्या दाखवत आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे करण्यात आलेल्या चौकशीत आरोपींनी अनेक धक्कादायक खुलासे केले. त्यांनी आपल्या अन्य साथीदारांसह लातूर जिल्ह्यातील विविध भागांमध्ये सोलार पॅनल, कॉपर वायर, केबल वायर, विद्युत साहित्य तसेच बोअरवेल मोटारींच्या चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. चोरी केलेले साहित्य विविध ठिकाणी विकून त्यातून मिळालेली रक्कमच त्यांच्या ताब्यात सापडल्याचे निष्पन्न झाले.

तपासादरम्यान आरोपींनी अरुण उर्फ बल्ली बारीकराव काळे, पिंटू मच्छिंद्र काळे, सुनील बबन शिंदे आणि शाम उर्फ अनिल बबन शिंदे या साथीदारांची नावे सांगितली असून त्यांचा शोध सुरू करण्यात आला आहे.

चौकशीतून समोर आलेल्या माहितीनुसार या टोळीने मुरुड, भादा, चाकूर, औसा, रेणापूर, उदगीर आणि एमआयडीसी लातूर परिसरात सोलार पॅनल, विद्युत केबल्स, कॉपर वायर व अन्य साहित्य चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा मिळविला होता. पोलिसांनी जिल्ह्याच्या गुन्हे अभिलेखांची पडताळणी केली असता आरोपींनी कबूल केलेल्या घटनांशी संबंधित एकूण १३ गुन्हे उघडकीस आले.

यामध्ये मुरुड पोलीस ठाण्याचे तीन, भादा पोलीस ठाण्याचे दोन, चाकूर पोलीस ठाण्याचे दोन, औसा पोलीस ठाण्याचे दोन, रेणापूर पोलीस ठाण्याचे दोन, एमआयडीसी पोलीस ठाण्याचा एक आणि उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याचा एक गुन्हा समाविष्ट आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील सौरऊर्जा प्रकल्प व शेतकऱ्यांच्या शेतांमधील सोलार यंत्रणा लक्ष्य करून या टोळीने चोरीची मालिका सुरू ठेवली होती.

या कारवाईत पोलिसांनी आरोपींकडून चोरीच्या मालाच्या विक्रीतून मिळालेली ११,०९,०००/- रोख रक्कम, गुन्हे करण्यासाठी वापरण्यात आलेली टाटा व्हिस्टा कार किंमत ५,००,०००/-, तसेच हिरो एचएफ डिलक्स मोटारसायकल किंमत ५०,०००/- असा एकूण १६,५९,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर आरोपींना अटक करून मुरुड पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ७३/२०२६ अन्वये पुढील कायदेशीर कारवाईसाठी हजर करण्यात आले आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली असून चोरीस गेलेल्या उर्वरित साहित्याचा मागोवा घेण्याचे काम सुरू आहे.

ही उल्लेखनीय कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस उपनिरीक्षक अमर केंद्रे, पोलीस अंमलदार संजय कांबळे, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड,मोहन सुरवसे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, युवराज गिरी, रियाज सौदागर, सिद्धेश्र्वर मदने राहुल कांबळे, गोविंद भोसले, अंजली गायकवाड, शैलेश सुडे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर आदींच्या पथकाने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने पार पाडली.

## साने गुरुजी

आज भारत मातेचे थोर सुपुत्र, स्वातंत्र्य सैनिक, समाजवादी विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, मराठी साहित्यिक साने गुरुजी यांची पुण्यतिथी. साने गुरुजी यांचे पूर्ण नाव पांडुरंग सदाशिव साने. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी कोकणातील पालगड येथे झाला. त्यांचे वडील सदाशिवराव हे पालगडचे खोत होते. लहानपणापासून साने गुरुजींचे त्यांच्या आईवर खूप प्रेम होते. त्यांच्यावर त्यांच्या आईच्या शिकवणुकीचा खूप प्रभाव होता. श्यामची आई या पुस्तकात त्यांनी आपल्या आईच्या साऱ्या आठवणी सांगितल्या आहेत. साने गुरुजींच्या आईने त्यांच्या बालमनावर जे संस्कार केले त्यातूनच त्यांचा जीवनविकास झाला. सर्वांवरती प्रेम करा हा धडा त्यांना त्यांच्या आईनेच दिला. साने गुरुजींचे मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते. म्हणूनच आईने पेरलेल्या सदभावनांची वाढ त्यांच्या ठिकाणी लवकर झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी अमंळनेर येथील प्रताप हायस्कूलमध्ये काहीकाळ शिक्षक म्हणून नोकरी केली. प्रताप हायस्कूलच्या वसतिगृहाची जबाबदारी सांभाळताना त्यांच्यातील शिक्षकाला अधिक वाव मिळाला. त्यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वाबलंबनाचे धडे दिले. सेवावृत्ती शिकवली. १९२८ साली त्यांनी विद्यार्थी हे मासिक सुरू केले. त्यानंतर त्यांनी विपुल लेखन केले. कांदबऱ्या, लेख, निबंध, काव्य, चरित्रे, नाट्यसंवाद अशा सर्व साहित्य प्रकारात त्यांची लेखणी अविरत चालली. त्यांच्या साहित्यात करुणा, स्नेह, प्रेम या गोष्टीचा वर्षाव झालेला आहे. त्यांच्या भाषेला एकप्रकारची धार आहे, बोध आहे. त्यांनी अतिशय साध्या आणि सोप्या शब्दात लेखन केल्याने लोकांना ते भावले. नाशिकच्या कारागृहात असताना त्यांनी श्यामची आई ही अजरामर कादंबरी लिहिली. धुळ्याच्या तुरुंगात त्यांनी विनोबा भावेंनी सांगितलेली गीताई लिहिली. साने गुरुजी थोर देशभक्त होते त्यांच्यावर महात्मा गांधींचा मोठा प्रभाव होता. ते स्वतः खादीचाच वापर करत. १९३० साली त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेतला त्यामुळे त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. काँग्रेस नावाचे साप्ताहिक त्यांनी सुरू केले, दुष्काळात शेतकऱ्यांची करमाफी मिळावी यासाठीही त्यांनी आंदोलन केले होते. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात त्यांनी भाग घेतला. भूमिगत राहून स्वातंत्र्याचा प्रचार, राष्ट्र सेवा दलाचे कार्य या माध्यमातून त्यांनी राजकीय कार्य केले. पत्री या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांनी अनेक देशभक्तीपर गीते लिहिली. त्यातील बलसागर भारत होवो... या गीताने तरुणांना स्फुरण चढले या गीताने प्रेरित होऊन हजारो तरुण स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. या गीताचा वाढता प्रसार पाहून इंग्रज सरकारने या काव्यसंग्रहाच्या प्रती जप्त करुन या गीतावर बंदी आणली. साने गुरुजींना अस्पृश्यता, जातीपात, रूढी परंपरा, अंधश्रद्धा याविषयी कमालीची चीड होती. या गोष्टींना त्यांनी नेहमीच विरोध केला. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात दलितांनाही प्रवेश मिळावा यासाठी १९४६ साली त्यांनी महाराष्ट्राभर दौरा केला. त्यासाठी त्यांनी उपोषण केले त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूरच्या विठ्ठलाचे मंदिर सर्वांसाठी खुले झाले. एका पांडुरंगाने दुसऱ्या पांडुरंगाला मुक्त केले असे त्यावेळी म्हटले गेले. स्वातंत्र्य मिळाल्यावर ते समाजवादी पक्षात सामील झाले. स्वातंत्र्यानंतर आंतरभारती चळवळीच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचा प्रयत्न केला. विविध राज्यातील लोकांनी एकमेकांची संस्कृती समजून घ्यावी, अनेक भाषा समजून घ्याव्यात असा उद्देश या चळवळीचा होता. त्यांनी स्वतः तामिळ व बंगाली या भाषा शिकल्या होत्या. १९४८ साली त्यांनी साधना हे मासिक सुरू केले. या मासिकांतून ते जनजागृती करू लागले. ११ जून १९५० रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. साने गुरुजींना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## 'दिलखुलास' 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात विजय कोळेकर यांची विशेष मुलाखत

मुंबई, दि. ९ : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे तत्कालीन कृषी विद्या तथा मृदा विज्ञान विशेषज्ञ विजय कोळेकर यांची हवामान अनुकूल तंत्रज्ञान व शाश्र्वत शेती व्यवस्थापन' या विषयावर विशेष मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे.




'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून दि. ११ ते १६ जून २०२६ या कालावधीत सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. आणि 'न्यूज ऑन एआयआर' या पवर देखील मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. तसेच 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत गुरुवार दि. ११ जून २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता महासंचालनालयाच्या समाज माध्यमांवरून प्रसारित करण्यात येणार आहे. निवेदिका सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.

X (Twitter): https://twitter.com/MahaDGIPRG$ý

Facebook: https://www.facebook.com/MahaDGIPRG$ý

YouTube: https://www.youtube.com/M-H-R-SHTR-DGIPRG$ý

हवामान बदलामुळे शेती क्षेत्रासमोर निर्माण होत असलेल्या आव्हानांच्या पार्श्र्वभूमीवर हवामान अनुकूल तंत्रज्ञान, जलसंधारण, कमी मशागत, रुंद वखारावरील लागवड, हवामान अनुकूल बियाण्यांची निवड, बीजप्रक्रिया, डीएसआर (उ्ळीशलीं ड्शशवशव ठ्ललश) पद्धती, नैसर्गिक व सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, फर्टिगेशन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, सुरक्षित फवारणी तंत्रज्ञान, काढणीपश्र्चात व्यवस्थापन, कृषी यांत्रिकीकरण तसेच डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) यांचा शेतीमधील वापर आदी विषयांवर या मुलाखतीत सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

'महाविस्तार एआय - शेतकऱ्यांचा डिजिटल मित्र' या उपक्रमाची माहिती, हवामान बदलाच्या पार्श्र्वभूमीवर पुढील काळातील शेतीतील अपेक्षित बदल, युवकांसाठी उपलब्ध होत असलेल्या कृषी क्षेत्रातील नव्या संधी आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया याविषयीदेखील श्री. कोळेकर यांनी तपशीलवार माहिती दिली आहे.

# लातूर जिल्ह्यास मंजूर खताची रॅक परजिल्ह्याकडे वळवली माजी मंत्री आ. निलंगेकरांच्या तक्रारीनतर जिल्हाधिकार्यांनी दिले चौकशीचे आदेश

लातूर/प्रतिनिधी :- खरीपाचा हंगाम तोंडावर आला असून जिल्ह्यातील शेतकरी खरीप पेरणीसाठी बियाणे व खताची जुळवाजुळव करण्यासाठी लगबग करीत आहेत. खरीपाचा हंगाम शेतकर्यांसाठी अत्यंत महत्वाचा असून या हंगामात शेतकर्यांना बियाणे व खताची टंचाई भासू नये यासाठी शासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र यादरम्यानच लातूर जिल्ह्यास मंजूर झालेली खताची रॅक परजिल्ह्याकडे वळविल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांना मिळाली. या संदर्भात कांहीजणांनी त्यांच्याकडे तक्रारसुद्धा केलेली होती. याचा परिणाम खरीपाच्या पेरणीवर होण्याची शक्यता असल्याने आणि शेतकर्यांना वेळेवर खत उपलब्ध व्हावे या उद्देशाने माजी मंत्री आ. निलंगेकरांनी तात्काळ यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्र देऊन तक्रार दिली होती. या तक्रारीनुसार जिल्हाधिकार्यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिलेले आहेत.

शेतकर्यांच्या दृष्टीने खरीपाचा हंगाम अंत्यत महत्वाचा असून या हंगामावरच शेतकर्यांचे अर्थचक्र



अवलंबून असते. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खरीपाची पेरणी होत असते. या पेरणीसाठी आता लगबग सुरु झालेली असून शेतकर्यांकडून बियाणे व खताची जुळवाजुळव करण्यास सुरुवात झाली आहे. या हंगामात शेतकर्यांना बियाणे व खताची टंचाई भासू नये असे स्पष्ट निर्देश राज्य शासनाने जिल्हाप्रशासनाला दिले आहेत. मात्र लातूर जिल्ह्यास मंजूर झालेली खताची रॅक परजिल्ह्याकडे वळवली गेली असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांना प्राप्त झाली. या माहितीची खातरजमा करून घेतल्यानंतर माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी तात्काळ या बाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली होती. याप्रकरणी माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी केलेल्या तक्रारीनुसार जिल्ह्याधिकार्यांनी तात्काळ याप्रकरणीची चौकशीचे आदेश दिलेले असून आगामी काळात या प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाय योजना करण्यासाठी संबंधीत विभागास निर्देश दिले आहेत. त्याचबरोबर आगामी काळातही जिल्ह्यातील शेतकर्यांना वेळेवर व मुबलक खत होऊन खताच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य कार्यवाही करण्याची मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकार्यांनी संबंधीत विभागास तात्काळ निर्देश देऊन यासंदर्भात कोणतीही दिरंगाई करू नये अशी सुचना दिली आहे.

## आयएमएच्या शहर स्वच्छता उपक्रमास चंद्रनगरातून सुरुवात वर्षभराचे वेळापत्रक तयार, लोकसहभाग वाढवण्याचा संकल्प लातूर, प्रतिनिधी

लातूर : शहर हरीत स्वच्छ



व पयार्वरणाणुकुल करण्याचा संकल्प आयएमएच्या लातूर शाखेने केला असून या विधायक उपक्रमास त्यांनी सुरुवातही केली आहे. शहर स्वच्छतेचे वर्षभराचे नियोजन करण्यात आले असून त्याची सुरुवात मंगळवारी (दि.९) चंद्रनगर येथून परिसर स्वच्छतेने करण्यात आली. या सेवाकार्यात डॉक्टर्स, मनपा कर्मचारी तसेच त्या परिसरातील नागरीक सहभागी झाले होते. चंद्रनगर येथील वर्धमान उद्यानात स्वच्छता करण्यात आली. पालापाचोळा,प्लास्टिक संकलीत करण्यात आले. उद्यानातील झाडांना आळे करण्यात आले. दोन ट्रॅक्टर कचरा संकलीत करण्यात आला. यात कॅरीबॅंग्जही असल्याने डॉक्टरांनी तेथील नागरीकांना प्लास्टिकचा कॅरीबॅग्जचा वापर करु नका कापडी पिशव्या वापरा असे आवाहन केले. नंतर डॉक्टरांनी त्या परिसरातील रसत्यांची स्वच्छता केली. दरम्यान आयएमएचे हे स्वच्छता अभियान वर्षभर सुरू राहणार असून दर महीन्याच्या ९,१९ व २९ तारखेला ही स्वच्छता होणार आहे. यासाठीचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. स्वच्छता श्रमदानाच्या तारखेची पूर्वकल्पना त्या भागातील नागरीकांना देण्यात येणार असून त्यांनाही या उपक्रमात सहभागी करुन घेतले जाणार आहे. शहर स्वच्छतेत लोकसहभाग वाढावा व हे अभियान लोकचळवळ व्हावी असा आएमएमएचा मानस असून त्यासाठी आम्ही प्रयत्नशिल राहणार असल्याचे लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत व सचिव डॉ. विश्रांत भारती यांनी सांगितले. लातूर महापालिका आयुक्त मानसी मीना , उपायुक्त वसुधा फड व त्याच्या टिमचे याकामी सहकार्य लाभत असल्याचे ते म्हणाले. चंद्रनगर येथील स्वच्छता कामात डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. विश्रांत भारती, डॉ. श्र्वेता पवार, डॉ. वर्षा दराडे, डॉ. आकांक्षा अवस्थी, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. गणेश पवार, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. शैला सोमाणी, डॉ आंनद कलमे, जयप्रकाश चितकोटे, सुनीता चितकोटे, अजय शहा, संजय बोरा, सुमन कलंत्री, आशिष कलंत्री,सुभाष दुर्गवाड यांच्यासह त्या परिसरातील नागरीक व महानगरपालिकेचे सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

## भाजपा शहर जिल्ह्याच्यावतीने स्वयंभू श्री केशवराज मंदिर परिसरात स्वच्छता करून जागतिक पर्यावरण दिन साजरा

लातूर : भाजपा शहर जिल्ह्याच्यवतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लातूरमधील स्वयंभू श्रीकेशवराज मंदिर, रामगल्ली तसेच रामलिंगेश्र्वर मंदिर परिसर येथे विश्र्वास, विकास व जनकल्याण अभियानांतर्गत विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



यामध्ये भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या नेतृत्वाखाली देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या यशस्वी बारा वर्षांच्या कार्यपूर्तीनिमित्त स्वच्छता हीच सेवा हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी मंदिर परिसराची स्वच्छता करून समाजात स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

नरेंद्रजी मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाने देशात स्वच्छतेविषयी जनजागृती निर्माण केली असून भारताला स्वच्छ, सुंदर आणि संस्कारित राष्ट्र बनवण्याचा संकल्प प्रत्येक भारतीयामध्ये जागृत केला आहे. मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून आपल्या सनातन संस्कृतीचे, अध्यात्माचे आणि हिंदुत्वाच्या विचारांचे जिवंत प्रतीक आहेत. त्यामुळे मंदिर परिसराची स्वच्छता म्हणजे केवळ साफसफाई नसून ती आपल्या संस्कारांची आणि श्रद्धेची सेवा आहे.

भगवान श्री महाविष्णू यांच्या दशावतारांचे दर्शन घडविणारे स्वयंभू श्रीकेशवराज मंदिर तसेच भक्ती आणि अध्यात्माचा वारसा जपणारे रामलिंगेश्र्वर मंदिर परिसर स्वच्छतेच्या माध्यमातून अधिक पवित्र आणि प्रेरणादायी बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भारतीय जनता पार्टीचे विरोधी पक्षनेते देविदास काळे, सरचिटणीस संजय गिर, मोदी सरकारची १२ वर्षे – विश्र्वास, विकास व जनकल्याण अभियान संयोजक प्रविण कस्तुरे , नगरसेवक गणेश गवारे, मंडल अध्यक्ष तथा अभियान सहसंयोजक सुरेश जाधव,राहुल भूतडा ,अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष मुन्ना हश्मी , कामगार मोर्चा अध्यक्ष ज्योतिराम चिवडे पाटील, किशोर शिंदे, राजेश पवार,अतिश कांबळे, अंकित बाहेती, सिमा करपे, करण हाके ,योगेश उन्हाळे, आनंद श्रीगिरे, संतोष तिवारी, हांडे शशिकांत, बाळासाहेब शिंदे, अभिजित मुनाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## एमएचटी सीईटी (पीसीबी)२०२५-२६ निकालात श्री स्वामी विवेकानंद जुनिअर कॉलेजचे घवघवीत यश

लातूर : महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षाएमएचटी सीईटी



(पीसीबी) २०२५–२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये जे.एस.पी.एम. लातूर संचलित श्री स्वामी विवेकानंद ज्युनीअर कॉलेज, एमआयडीसी, लातूरच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून कॉलेजच्या लौकीकामध्ये भर पाडण्याचे कार्य केलेले आहे.

यामध्ये पांढरे ज्ञानेश्र्वरी सुरज हिने ९९.३० पर्सेंटाइल मिळवून उज्वल यश संपादन केले. तसेच यश आनंदकुमार गटागट याने ९७.६० पर्सेंटाइल मिळवून उत्कृष्ट यश संपादन केलेले आह. यांच्यासह इतर अनेक विद्यार्थ्यांनीही घवघवीत यश मिळवत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, कठोर परिश्रम, पालकांचे प्रोत्साहन तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन कारणीभूत ठरले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जे.एस.पी.एम. लातूर संस्थेचे अध्यक्ष मा. आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, सचिव प्रतिभाताई पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रणजीतसिंह पाटील कव्हेकर, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपप्राचार्य मनोज गायकवाड सर्व विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## लातूर व्यापारी महासंघाचा शिक्षण विभागाला इशारा; शाळांकडून शैक्षणिक साहित्य विक्री थांबविण्याची मागणी

लातूर, दि. ९ जून : लातूर जिल्ह्यातील काही शैक्षणिक



संस्थांकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी सक्ती केली जात असल्याचा गंभीर आरोप करत लातूर व्यापारी महासंघाने जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे निवेदन सादर केले आहे. या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधित शाळांवर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही महासंघाने दिला आहे.

लातूर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष यांच्या स्वाक्षरीने जिल्हा परिषदेचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जिल्ह्यातील काही मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये ज्युनिअर केजी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य थेट शाळेमार्फत विक्री केले जात आहे. शिक्षण देण्याचे काम करणाऱ्या संस्थांनी व्यवसायाचे स्वरूप धारण करणे योग्य नसून, यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, गणवेश, स्टेशनरी तसेच इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट ठिकाणाहूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. काही ठिकाणी विशिष्ट प्रकाशकांची पुस्तके किंवा विशिष्ट कंपनीचे साहित्य खरेदी करण्यासाठी पालकांवर दबाव टाकला जात असल्याचेही व्यापारी महासंघाने म्हटले आहे. परिणामी पालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून, खुल्या बाजारातील स्पर्धात्मक दरांचा लाभ त्यांना मिळत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

महासंघाने पुढे म्हटले आहे की, शाळांनी विद्यार्थ्यांना केवळ आवश्यक शैक्षणिक साहित्याची यादी द्यावी; मात्र त्या साहित्याची खरेदी कोणत्याही विशिष्ट दुकानातून अथवा पुरवठादाराकडून करण्याची सक्ती करू नये. तसेच शैक्षणिक संस्थांनी स्वतः शैक्षणिक साहित्य विक्री केंद्र चालविणे टाळावे. शिक्षण क्षेत्रातील व्यावसायिकीकरणाला आळा घालण्यासाठी प्रशासनाने स्पष्ट निर्देश देण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, जर एखाद्या शैक्षणिक संस्थेने विशिष्ट दुकान अथवा कंपनीचे नाव सुचवून साहित्य खरेदीची सक्ती केली, तर त्याची चौकशी करून संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच जिल्ह्यातील सर्व शाळांना याबाबत परिपत्रक काढून स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, अशी विनंतीही करण्यात आली आहे.

लातूर व्यापारी महासंघाने या प्रश्र्नाकडे केवळ व्यापारी हिताचा विषय म्हणून नव्हे, तर पालकांच्या आर्थिक हिताशी निगडित प्रश्र्न म्हणून पाहिले पाहिजे, असे मत व्यक्त केले आहे. शिक्षण संस्थांनी विद्यार्थी आणि पालकांच्या हिताला प्राधान्य देत पारदर्शकता राखावी, अशी अपेक्षाही महासंघाने व्यक्त केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने योग्य ती कारवाई न केल्यास संबंधित शैक्षणिक संस्थांसमोर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा व्यापारी महासंघाने दिला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्था आणि प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनामुळे जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, शिक्षण विभाग या प्रकरणाची कोणत्या पद्धतीने दखल घेतो, याकडे पालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर लातूर शहरातील व्यापारी रामेश्र्वर भराडीया, गोकुळ जैन, साहिल कुलकर्णी, मनोज इंदुरे, गणेश काकडे, कीर्ती जीएम स्टोअर्स, मानसी पुस्तकालय, बालाजी ट्रेडर्स, शिवम ट्रेडर्स, नेहा स्टेशनरी शॉपी, वरवटे सुधीर, शेख सत्तार, मारुती रतन पवार, श्री गणेश, श्री समर्थ बुक सेल्स, पियुष कचोरिया, भारतीय पुस्तकालय, सुपर शॉपी एजन्सी, यश बुक स्टॉल, माऊली एजन्सी, गटागट स्टोअर्स, शिवसागर जनरल, शिवकृष्णा डिपार्टमेंटल, सिद्धेश्र्वर पांचाळ, वैभव ढोले, रजाक शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी . २० वर्षांपासून फरार असलेल्या आर्म क्टमधील आरोपीस परजिल्ह्यातून अटक

लातूर : गुन्हेगार कितीही चलाखीने कायद्यापासून दूर पळण्याचा प्रयत्न करत असला तरी कायद्याचा हात शेवटी त्याच्यापर्यंत पोहोचतो, याची प्रचिती पुन्हा एकदा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिली आहे. तब्बल २० वर्षांपासून प्रशासनाला गुंगारा देत, आपली ओळख, वास्तव्य आणि हालचाली सतत बदलत राहणाऱ्या आर्म क्टमधील फरार आरोपीस लातूर पोलिसांनी परजिल्ह्यातून शोधून काढत अटक केली आहे. या कारवाईमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या गंभीर गुन्ह्याचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे सन २००६ मध्ये भारतीय हत्यार कायद्यांतर्गत दाखल असलेल्या गुरनं. ३०४१/२००६ कलम २५(१)(३) मधील आरोपी सिद्धेश्र्वर ऊर्फ सिद्राम ऊर्फ पिंटू वसंत मुळे (वय ४१ वर्षे, रा. डाळींब, ता. उमरगा, जि. धाराशिव) हा मागील दोन दशकांपासून फरार होता. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाही आरोपी सातत्याने ठिकाणे बदलत राहिल्याने त्याला अटक करणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत होते.

लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील फरार आरोपी, पाहिजे गुन्हेगार आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने या आरोपीचा शोध घेण्याचे काम हाती घेतले होते.

तपासादरम्यान पथकातील दत्तात्रय शिंदे यांना आरोपी सिद्धेश्र्वर मुळे हा उमरगा परिसरात वास्तव्य करत असल्याची गोपनीय




माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीची गुप्तपणे पडताळणी करण्यात आली. माहिती विश्र्वसनीय असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून विशेष पथकाने उमरगा येथे रवाना होत नियोजनबद्ध सापळा रचला. त्यानुसार आरोपीस हनुमान मंदिर, डाळींब, ता. उमरगा परिसरातून ताब्यात घेण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीस पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर करण्यात आले.

*२० वर्षांपूर्वी उघडकीस आले होते बेकायदेशीर शस्त्र प्रकरण.*

या गुन्ह्याची सुरुवात दि. १० जुलै २००६ रोजी झाली होती. त्यावेळी पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, दोन इसम बेकायदेशीर शस्त्रास्त्रांसह संशयास्पदरीत्या फिरत आहेत. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी मिरा हॉटेल परिसरात सापळा रचून दोन संशयितांना ताब्यात घेतले होते.

त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे देविदास रघुनाथ पांचाळ ऊर्फ सुतार (रा. तोरंबा, ता. उमरगा) आणि सिद्धेश्र्वर ऊर्फ पिंटू वसंत मुळे (रा. डाळींब, ता. उमरगा) अशी सांगितली. पोलिसांनी त्यांची अंगझडती घेतली असता सिद्धेश्र्वर मुळे याच्या कमरेला अडकवून ठेवलेले एक गावठी पिस्तूल (कट्टा) आढळून आले. तसेच त्याच्या पँटच्या खिशातून कागदात गुंडाळलेले जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. दुसरा आरोपी देविदास पांचाळ याच्याकडील नायलॉन पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये गावठी कट्टा तयार करण्यासाठी लागणारे विविध साहित्य आढळून आले होते.

या घटनेनंतर भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतर सिद्धेश्र्वर मुळे याने विविध ठिकाणी वास्तव्य बदलले, आपली ओळख लपवली आणि सतत हालचाली बदलत राहिल्यामुळे तो पोलिसांच्या हाती लागत नव्हता.

फरार आरोपीचा शोध घेत असताना पथकाने विविध जिल्ह्यांमध्ये जाऊन त्याच्या नातेवाईकांची, परिचितांची तसेच संभाव्य वास्तव्याच्या ठिकाणांची माहिती गोळा केली. तपासादरम्यान दुसरा आरोपी देविदास रघुनाथ पांचाळ ऊर्फ सुतार याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली. त्याबाबत त्याच्या पत्नींकडून अधिकृत मृत्यू प्रमाणपत्र प्राप्त करून तपासाची नोंद पूर्ण करण्यात आली.

सिद्धेश्र्वर मुळे याने जवळपास दोन दशके पोलिसांना चकवा दिला असला तरी पथकाने अत्यंत संयम, कौशल्य आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून त्याचा शोध लावला. अखेर उमरगा परिसरातून त्यास अटक करण्यात यश आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता मा. मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. सतीश एन. पाटील यांनी त्यास न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील पुढील तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे.

लातूर जिल्हा पोलीस दलाचे विशेष पथक जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यांतील फरार, पाहिजे व डारमंड फाईलमधील आरोपींचा शोध घेण्यासाठी सातत्याने काम करत असून अनेक आरोपींना अटक करून संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कारवाईमुळे कायद्यापासून पळ काढणाऱ्या गुन्हेगारांना स्पष्ट संदेश देण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, रसूल पठाण ,चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

## एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्यू

लातूर : येथील एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या



ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या पुढाकाराने नेक्सनोवा प्रोटेक, पुणे कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये इंजीनियरिंगच्या ७ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड झाली. त्यामध्ये कॉम्प्युटर अभियांत्रिकी च्या ४ विद्यार्थ्यांचे आणि इन्फॉरमेशन टेकनॉलॉजि च्या ३ विद्यार्थ्यांची निवड झाली.या विद्यार्थ्यांना रु. ४.५ ते ६ लाख वार्षिक मानधन मिळणार आहे. कठीण असलेल्या या प्रक्रियेमध्ये दोन लेखी परीक्षा घेण्यात आल्या. यातून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. वैयक्तिक मुलाखती पुढील आठवड्यात घेण्यात येणार आहेत. या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये व्हीडिफ स्कूल ऑफ इंजिनीरिंग अँड टेकनॉलॉजिच्या विद्यार्थ्यांनी पण सहभाग नोंदवला.

यावेळी प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्राध्यापक श्रीकांत नागुरे , डॉ.प्रा.ओमप्रकाश शिवपुजे,श्री संतोष सांगवे प्रा.राहुल व्यवहारे, प्रा. शंकर तोडकरी, यांनी काम पाहिले.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष श्री माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव श्री माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव श्री सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष श्री विजय रेवडकर,कार्यकारी संचालक श्री प्रदीप दिंडेगावे,.संचालक श्री राजेश्र्वर बुके, श्री बसवराज येरटे, श्री काशिनाथ साखरे, सौ ललिता ताई पांढरे, श्री महेश हलगे, श्री बाबुराव तरगुडे,श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेखर जगदे,उप प्राचार्य वीरभद्र बाळे निबंधक डॉ. सौ ज्योती पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि संबंधित प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

# होमगार्ड त्रैमासिक संमेलनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर, ८३ रक्तपिशव्यांचे संकलन; औसा पोलीस ठाण्याच्या शिबिरातही १३४ रक्तपिशव्या संकलित

लातूर : रक्तदान हेच श्रेष्ठ दान या मानवतावादी भावनेतून पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून लातूर जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या विविध रक्तदान उपक्रमांना नागरिक, होमगार्ड जवान, पोलीस अधिकारी–अंमलदार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. होमगार्ड त्रैमासिक संमेलनाच्या निमित्ताने पोलीस मुख्यालय, बाभळगाव येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिरात ८३ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले, तर पोलीस ठाणे औसा येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल १३४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले होते. या दोन्ही उपक्रमांमधून एकूण २१७ रक्तपिशव्यांचे संकलन होऊन समाजाप्रती कर्तव्यभावना आणि मानवसेवेचा आदर्श निर्माण झाला आहे.

होमगार्ड लातूर जिल्हा शाखा, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ जून २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, बाभळगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या उपक्रमाचा उद्देश रुग्णालयांमध्ये रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध करून देणे, अपघातग्रस्त व गंभीर रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध करून देणे आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण करणे हा होता.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने होमगार्ड जवान, पोलीस अधिकारी–अंमलदार, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी आणि नागरिकांनी सहभाग नोंदविला. रक्तदानासाठी आलेल्या प्रत्येक रक्तदात्याने सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवत मानवसेवेच्या या पवित्र कार्यात आपले योगदान दिले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या वतीने जपश क्शश्राशीं जपश डळषश या जनजागृती उपक्रमांतर्गत रक्तदात्यांना मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे महत्त्व अधोरेखित करण्याचा हा अभिनव उपक्रम उपस्थितांच्या विशेष आकर्षणाचा विषय ठरला. हेल्मेटचा वापर म्हणजे सुरक्षित प्रवास हा संदेश देत नागरिकांमध्ये सुरक्षित वाहनचालना संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दरम्यान, पोलीस ठाणे औसा येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरालाही नागरिकांनी आणि पोलीस दलातील अधिकारी–कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्या शिबिरात तब्बल १३४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले होते. त्यामुळे लातूर जिल्ह्यात रक्तदानाची चळवळ अधिक व्यापक होत असल्याचे चित्र दिसून आले.

रक्तदानामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात, तसेच अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती किंवा गंभीर आजारांमुळे रक्ताची आवश्यकता भासणाऱ्या रुग्णांना वेळेत मदत मिळते. त्यामुळे समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने नियमित रक्तदान करून समाजसेवेच्या या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी आयोजकांकडून करण्यात आले.

लातूर जिल्ह्यात पोलीस विभाग, होमगार्ड संघटना, रेडक्रॉस सोसायटी आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असून मानवतेची भावना अधिक दृढ होत आहे. रक्तदान आणि रस्ते सुरक्षा या दोन्ही महत्त्वपूर्ण विषयांची सांगड घालणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हे शिबिर यशस्वी झाले असून रक्तदानाच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे.

## ‘प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६’ साठी नामांकनांना सुरुवात अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै

नवी दिल्ली, दि. ९: प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२६




साठी ऑनलाईन नामांकन प्रक्रिया सुरू झाली असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ निश्र्चित करण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज र्हींिि://रुरीवी.सीें.ळप या संकेतस्थळावर सादर करण्याचे आवाहन महिला आणि बाल विकास मंत्रालयाने केले आहे.

भारतात वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक आणि ३१ जुलै २०२६ रोजी ५ ते १८ वर्षे वयोगटातील बालके या पुरस्कारासाठी पात्र आहेत. या पुरस्कारासाठी स्व–नामांकन तसेच तृतीय पक्षाकडून शिफारस अशा दोन्ही प्रकारच्या अर्जांना मान्यता दिली जाणार आहे.

अर्ज करताना उमेदवारांनी वैयक्तिक माहिती, पुरस्काराचा प्रवर्ग, अलीकडील छायाचित्र आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच आपल्या उल्लेखनीय कामगिरीची आणि तिच्या समाजावरील प्रभावाची माहिती १,००० शब्दांपर्यंत सादर करावी लागणार आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांतर्गत शौर्य, क्रीडा, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, पर्यावरण तसेच कला व संस्कृती या सहा क्षेत्रांमध्ये असाधारण कामगिरी करणाऱ्या बालकांचा गौरव करण्यात येतो. शौर्य प्रवर्गात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता इतरांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्य दाखवणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. क्रीडा प्रवर्गात राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या मुलांना गौरविण्यात येते. समाजसेवा प्रवर्गात समाजकल्याण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि राष्ट्रीय कार्यांमध्ये सक्रिय योगदान देणाऱ्या मुलांचा सन्मान केला जातो. विज्ञान व तंत्रज्ञान प्रवर्गात संशोधन, नवोपक्रम किंवा वैज्ञानिक नमुने विकसित करणाऱ्या मुलांना पुरस्कार दिला जातो. पर्यावरण प्रवर्गात शाश्र्वत विकास, जनजागृती मोहीम किंवा पर्यावरणपूरक नवकल्पनांमध्ये विशेष योगदान देणाऱ्या मुलांची निवड केली जाते. तर कला व संस्कृती प्रवर्गात संगीत, नृत्य, लेखन, चित्रकला, अभिनय किंवा इतर कलाक्षेत्रांमध्ये उल्लेखनीय प्रावीण्य मिळवलेल्या मुलांचा गौरव केला जातो.

महिला आणि बाल विकास मंत्रालयाने शाळा, शैक्षणिक संस्था, पालक, मार्गदर्शक आणि सर्वसामान्य नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांनी देशातील प्रतिभावान आणि प्रेरणादायी बालकांचा शोध घेऊन त्यांच्या नावांची शिफारस करावी. देशातील प्रत्येक गुणी आणि कर्तृत्ववान बालकाला राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी मिळावी, यासाठी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा.

## नवतंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार करताना पत्रकारांनी सत्य पडताळणी आणि संपादकीय जबाबदारी अबाधित राखावी - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई, दि. ९ : पत्रकारांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सातत्याने समाजासमोर मांडाव्यात. समाजातील दुर्लक्षित घटकांच्या प्रश्र्नांना प्राधान्य द्यावे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील महत्त्वाचे साधन असले तरी भविष्य केवळ एआयवर अवलंबून नसून त्याच्या वापराला दिशा देणारी मानवी बुद्धिमत्ता, विवेक, सद्सद्विवेकबुद्धी आणि मूल्ये यावरच ते अवलंबून आहे. पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा जबाबदारीने स्वीकार करताना सत्य पडताळणी आणि संपादकीय जबाबदारी अबाधित राखावी, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पत्रकारांच्या महाअधिवेशनात ते बोलत होते. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, प्रेरणादायी वक्ते गौर गोपाल दास, सकाळ मीडिया समूहाचे समूह संपादक निलेश खरे, वरिष्ठ पत्रकार सरिता कौशिक, मृणालिनी नानिवडेकर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, मराठी पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष किरण जोशी, पत्रकार संघाचे पदाधिकारी, राज्यातून आलेले पत्रकार आदी यावेळी उपस्थित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, महाराष्ट्राने देशाला वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक नेतृत्व दिले आहे. संत ज्ञानेश्र्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव अशा संतांनी समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश दिला आहे तसेच लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आचार्य अत्रे यांनी पत्रकारिता आणि लेखणीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे अविस्मरणीय कार्य केले. महाराष्ट्रातील पत्रकारांना या समृद्ध परंपरेचा वारसा लाभला असल्याचे देखील त्यांनी यावेळी नमूद केले.

# अधिकाऱ्यांनी सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण वृत्तीचा स्वीकार करावा - पोलिस महासंचालक सदानंद दाते

नाशिक, दि. ९ (जिमाका वृत्तसेवा) : पोलिस सेवेत येणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण ही त्रिसुत्री अंगीकारत कायद्याचे रक्षक आणि समाजाचे संवेदनशील सेवक व्हावे, असे आवाहन राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी केले. महाराष्ट्र पोलिस अकादमीत आज सकाळी प्रशिक्षणार्थी पोलिस उपनिरीक्षक सत्र क्रमांक १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ४२० पुरुष (गोवा राज्यातील एक प्रशिक्षणार्थीसह) व १६३ महिला असे एकूण ५८३ प्रशिक्षणार्थ्यांनी १२ महिने कालावधीचे मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र पोलिस दलात दाखल झाले. अकादमीचे संचालक नवल बजाज उपस्थित होते. त्यांनी पोलिस दलात दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. यावेळी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी उपस्थित होते.



पोलिस महासंचालक श्री. दाते म्हणाले की, गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात पोलिसांनी मोठे यश मिळविले आहे. आता तेथील जनतेच्या मनात सुरक्षेबरोबरच सेवेची भावना रुजविण्याचे महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. गुन्हेगारीचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे. सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. या आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम होणे काळाची गरज आहे. अमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी तरुण अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करावी. कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे प्रसंगावधान आणि समस्या सोडविण्याची क्षमता ही पदापेक्षा अधिक महत्वाची ठरते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सांघिक भावनेने काम करावे. पोलिस दलाची खरी ताकद जनतेचा पोलिसांवरील विश्र्वासात असते. नागरिक पोलिस ठाण्यात कायदेशीर मदतीबरोबरच न्याय आणि सुरक्षितता शोधत येतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी कायद्याचे रक्षक आणि समाजाचे संवेदनशील सेवक बनावे. प्रत्येक पोलिस हा गणवेशातील नागरिक असून नागरिक हा गणवेश नसलेला पोलिस आहे ही भावना समाजामध्ये रुजवावी, असे आवाहनही पोलिस महासंचालक श्री. दाते यांनी केले.

पारितोषिक विजेते प्रशिक्षणार्थी

रिव्हॉल्व्हर ऑफ ऑनर, कै. यशवंतराव चव्हाण सुवर्ण करंडक (सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी),

अहिल्याबाई होळकर करंडक (सर्वोत्कृष्ट महिला प्रशिक्षणार्थी) : उत्कर्षा शशिकांत जाधव.

द्वितीय सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी : मोहन चमाबाई मच्छिंद्र पालमपल्ली.

कायदा विषयात सर्वोत्कृष्ट (डॉ. बी. आर. आंबेडकर करंडक) : अमृता माया सुभाष जाधव.

सर्वोत्कृष्ट नेमबाज (एन. एम. कामटे सुवर्ण करंडक) : राजू जया दत्तात्रय जाधव.

सर्वोत्कृष्ट कवायत : बळिराम धोंडूबाई मानेजी बुडसे

सर्वोत्कृष्ट अभ्यास (सिल्व्हर बॅटन) : वैशाली सविता अर्जुन शेळके

दीक्षांत सोहळ्यासाठी सहसंचालक नंदकुमार ठाकूर, उपसंचालक (बाह्य वर्ग) प्रशांत खैरे, उपसंचालक (प्रशिक्षण) गीता चव्हाण, उपसंचालक (सेवांतर्गत प्रशिक्षण) महेश चिमटे, उपसंचालक (आयटी व सुरक्षा) पद्मजा चव्हाण– बढे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सिंधुदुर्गातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण करा - वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

मुंबई, दि. ९ : सिंधुदुर्ग जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बांधकामास गती देऊन निर्धारित कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. मंत्रालयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग येथील बांधकामाबाबत आढावा बैठक झाली.त्यावेळी श्री.मुश्रीफ बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी तसेच दूरदृष्य प्रणालीद्वारे सिंधुदुर्ग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री मुश्रीफ म्हणाले की, राज्य शासनाच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना बळकटी देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे .शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, या प्रकल्पासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला आहे.या प्रकल्पासाठी एकूण रु. ४०.१० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेबाबतही महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा व्यवस्था करण्यात येत असून, महावितरणकडून वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.



सिंधुदुर्ग जिल्ह्यात आधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. वैद्यकीय शिक्षणाच्या संधी वाढविण्याबरोबरच कोकण विभागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यास या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश मंत्री मुश्रीफ यांनी यावेळी दिले.

सिंधुदुर्गातील हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कार्यान्वित झाल्यानंतर जिल्ह्यासह संपूर्ण कोकण पट्ट्यातील आरोग्य व्यवस्थेला मोठा आधार मिळणार आहे.

# पालखी मार्गांचे हरितीकरण एक लोकचळवळ बनवू या - मंत्री ड. आशिष शेलार

मुंबई : दि. ९ : आषाढी वारीच्या परंपरेला पर्यावरण संवर्धनाची जोड देऊन राज्यातील पालखी मार्गांचे व्यापक हरितीकरण करण्यास शासन कटीबद्ध आहे. हा उपक्रम शासन, अध्यात्मिक संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून एक लोकचळवळ म्हणून राबविण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार यांनी निर्मल वारी आणि हरित वारी उपक्रमाच्या आढावा बैठकीत दिले. बैठकीत पालखी मार्गांवरील वृक्षारोपण आणि हरितीकरणाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पालखी मार्गावर वृक्ष संवर्धनासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, यासाठी पंढरपूर संस्थानचे विश्र्वस्त तथा संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजीराव मोरे यांनी केलेल्या विनंतीची प्राधान्याने दखल घेत या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या उपक्रमाचे मार्गदर्शक शिवाजी महाराज मोरे, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, पर्यावरण व हवामान बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अभिजीत औटे, वन विभागाचे विवेक खांडेकर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सेवा सहयोग फाउंडेशनचे अतुल नागरस व नरेंद्र वैशंपायन हेदेखील उपस्थित होते. राज्यातील संत ज्ञानेश्र्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्गांवर वारकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हरित पट्टे विकसित करण्यात येत आहेत. क्रिकेटच्या सामन्यादरम्यान जेवढे डॉट बॉल पडतील, तेवढे वृक्ष लावण्याचा लोकहितकारी उपक्रम मुंबई क्रिकेट असोसिएशनने हाती घेतला आहे. या उपक्रमातूनही या पालखी मार्गाचे हरितीकरण शक्य असल्याची सूचना मोरे यांनी यावेळी केली. त्यानुसार मंत्री ड. शेलार यांनी तात्काळ मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधून वृक्ष लागवडीसाठी पालखी मार्गांचा विचार प्राधान्याने करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाचा सामना आणि ग्रामीण रोजगार निर्मितीच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तब्बल ३०० कोटी वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी अभियान हाती घेतले आहे.

## पाणीपुरवठा योजनांच्या अंमलबजावणीसाठी आय.एम.आय. एस प्रणालीत पूर्ण माहिती भरावी - मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई, दि. ९ : कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ विधानसभा



मतदारसंघातील जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सहा गावांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित गावामधील योजनांची कामे पूर्ण क्षमतेने चालू आहेत, तसेच योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी आय.एम.आय.एस (इंटिग्रेटेड मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम) प्रणाली मध्ये पूर्ण माहिती भरावी, असे निर्देश पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

शिरोळ विधानसभा मतदारसंघातील जल जीवन योजनेच्या कामांबाबत मंत्रालयात श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. शिरोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र पाटील (यड्रावकर), पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन – नैनुटीया, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव श्रीरंगा नायक, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी प्रशांत भामरे, पुणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंत्या वैशाली आवटे, कोल्हापूर येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता डी. के. पाटील, कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अर्जुन गोळे, उपअभियंता एस.एस.लोहार उपस्थित होते. कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन या दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाल्या होत्या.

श्री. पाटील म्हणाले की, शिरोळ विधानसभा मतदारसंघातील १५ नळ पाणीपुरवठा योजना तांत्रिक कारणांमुळे हस्तांतरित झाल्या नाहीत. त्यापैकी एका गावच्या नळ पाणी पुरवठा योजनेअंतर्गत महावितरणचे काम पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर करावा. यावेळी जल जीवन मिशन कार्यक्रमातील शिरोळ तालुक्यातील हरोली, नांदणी आणि यड्राव नळपाणी पुरवठा योजनेचा आढावा घेऊन मंत्री पाटील यांनी नवे दानवाड नळ पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव पाठवावा, तसेच लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घ्यावी, असे निर्देश दिले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894